Exh. 5

**को.वि. श्रीमान दिवाणी न्यायधिश साहेब, कनिष्ठ स्तर, सावनेर**

नि.दि.मु.नं. /२०२५ दाखल ता. १९/१२/२०२५

अर्जदार/ :— श्री. ज्ञानेश्वर देवरावजी बोनसुले
वादी वय ६० वर्ष, धंदा— शेती
रा. कोहळी ता. कळमेश्वर जि. नागपूर

— विरूध्द —

Order
Issue show cause notice to defendants.
SANJEEV AKARAM SARDAR Digitally signed by SANJEEV AKARAM SARDAR
CJSD Saoner
01-01-2026

गैरअर्जदार/ :—१) श्री. नितीन यादवराव आवारी
प्रतिवादी वय ४२ वर्ष, धंदा— शेती
रा. सेलू, ता. कळमेश्वर जि. नागपूर

२) सहमामलतदार तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कळमेश्वर जि. नागपूर

NOTARY LANKESH A. GAJBHIYE DIST NAGPUR (M.S.) INDIA Regd. No. 15626 My Term Expires on 25/11/2029 GOVT. OF INDIA

**तात्पुरत्या मनाई हुकूमाकरीता अर्ज**

अर्जदार यांचा अर्ज येणेप्रमाणे :—

१) असे की, ज्याअर्थी गैरअर्जदार नं. १ नामे श्री. नितीन यादवराव आवारी, रा. सेलू, ता. कळमेश्वर जि. नागपूर यांनी "मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ चे कलम ५" प्रमाणे जुन्या वहीवाटीचा रस्ता मोकळा करण्याबाबत अर्ज गैरअर्जदार नं. २ कडे सादर केला होता. त्यावर दिनांक २१/११/२०२५ रोजी आदेश पारीत करण्यात आला त्या आदेशाविरूध्द सदर प्रकरणात दाखल करण्यात आले आहे. त्या वादपत्र निशानी १ मधील परिच्छेद नं. १ ते १२ मधील मजकुर या निशानी ५ च्या अर्जाचा भाग समजण्यात यावे. कारण त्यामुळे वादपत्रातील मजकुराची पुर्नरावृत्ती होणार नाही.

२) असे की, गैरअर्जदार नं. १ यांनी गैरअर्जदार नं. २ यांचेकडे वहीवाटीच्या रस्त्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नसतांना अर्ज सादर करून गैरअर्जदार नं. २ यांनी खोटा आदेश पारीत केला आहे. कारण गैरअर्जदार नं. १ यांनी वादग्रस्त भुमापन क्र. २९९, ३०० व २९७/१ व २९७/२ हे सुध्दा खरेदीकेलेले आहे. परंतु त्यांनी फक्त भुमापन क्र. २०० व ३०० करीता रस्त्याची मागणी केली होती. त्यामुळे सदर प्रकरण बनावट असल्याचे दिसून येते.

//२//

Scanned with OKEN Scanner

३) असे की, अर्जदार यांनी दाखल केलेला दावा/अर्ज प्राथमिक दुष्टया खरा असल्याचे दिसून आणि या दाव्याचा अर्जदार/वादीचा बाजूने निकाल लागण्याची पूर्ण शक्यता असल्याने तसेच अर्जाचा संपूर्ण कल हा अर्जदार/वादीच्या बाजूने आहे आणि मामलतदार न्यायालयाच्या आदेशानुसार अर्जदार/वादीच्या शेतामधून गैरअर्जदार नं. १ यांनी वहीवाट केल्यास त्यांच्या शेतातील पिकाचे नुकसान होवून जागा पडीत राहण्याचे शक्यता असून अगोदरच गैरअर्जदार नं. १ यांनी जे.सी.बी. ने बांध काढून टाकल्याने पावसाळयामध्ये पाण्याने शेतमालाची नुकसान होण्याची पूर्ण शक्यता आहे तसेच संत्रा झाडाचेही नुकसान केलेले आहे त्यामुळे अर्जदार/वादीचे कधीही न भरून निघणारे नुकसान होईल. त्यामुळे अर्जदार/वादीला तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज दाखल करावा लागत आहे.

करीता अर्ज सादर.

प्रार्थना :— तरी को.वि. साहेबांना नम्र विनंती आहे की, विद्यमान न्यायालयाने आदेश पारीत करून—

१) तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश पारीत करून गैरअर्जदार त्यांचे नौकर चाकर अथवा इतर कोणतेही व्यक्तीला दावा मिळकत सर्व्हे नं. ३०१, ३०२ व ३०३ मधील रस्त्यावर अतिक्रमण करून वहीवाट करण्यास दाव्याचा निकाल लागेपर्यन्त तात्पुरती मनाई करण्यात यावी.

२) गैरअर्जदार यांच्या गैरहजेरीमध्ये अंतरीम तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश पारीत करून गैरअर्जदार, त्यांचे नौकर चाकर अथवा इतर कोणतेही व्यक्तीला दावा मिळकतीतील प्रस्तावित रस्त्यावर अतिक्रमण व वहीवाट करण्यापासून व शेतातील मालाचे नुकसान करण्यापासून निशानी ५ च्या अर्जाचा निकाल लागेपर्यन्त अंतरीम तात्पुरती मनाई करण्यात यावी.

३) इतर कोणताही तात्पुरता न्यायसंगत न्याय देण्यात यावा.

//४//

NOTARY A. GAJBHIYE NAGPUR INDIA 13626 Expires 2029 INDIA

Scanned with OKEN Scanner

NOTARIAL REG.
ENTRY NO. 1250
DATE 19/12/2025



४) अर्जाचा/दाव्याचा खर्च प्रतिवादी/गैरअर्जदाराकडून वसुल करण्यात यावा.

सावनेर
दिनांक १९/१२/२०२५

अर्जदार/वादी

वादी/अर्जदारातर्फे वकील

## :: पडताळणी ::

मी वरील दाव्यातील संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहीती व सांगण्याप्रमाणे लिहला असून तो मला वाचून व समजावून देण्यात आलेला असून तो माझे माहीतीनुसार व विश्वासपूर्ण खरा व बरोबर असून विश्वसनिय आहे. करीता आज दिनांक १९/१२/२०२५ रोजी सावनेर येथे न्यायालयासमक्ष स्वाक्षरी केली आहे.

वादी / अर्जदार

## :: सत्यापन ::

मी प्रतीज्ञार्थी श्री. ज्ञानेश्वर देवरावजी बोनसुले, वय– ५५ वर्ष, धंदा– शेती रा. कोहळी ता. कळमेश्वर जि. नागपूर प्रतिज्ञेवर जाहीर करतो की, वरील दाव्यातील/अर्जातील परिच्छेद क्र. १ ते मधील संपूर्ण मजकूर माझे स्वतःचे माहीती व सांगण्याप्रमाणे लिहला असून तो मला वाचून व समजावून देण्यात आलेला असून तो माझे माहीतीनुसार व विश्वासपूर्ण खरा व बरोबर असून विश्वसनिय आहे. करीता आज दि. १९/१२/२०२५ रोजी सावनेर येथे न्यायालयासमक्ष स्वाक्षरी केली आहे.

प्रतिज्ञार्थी

मी प्रतिज्ञार्थीस ओळखतो

ॲड. हेमंत ताजने

NOTARY ... A. GAJBHIYE ... NAGPUR ... No. 15626 ... Expires 11/2029 ... INDIA

Scanned with OKEN Scanner

NOTARY
LANKESH A. GAJBHIYE
DIST. NAGPUR
(M.S.) INDIA
Regd. No. 15626
My Term Expires
on 25/11/2039
GOVT. OF INDIA

NOTARY
L. A. GAJBHIYE
DIST. NAGPUR (M.S.) INDIA
REGD. No. 15626
GOVT. OF INDIA

SWORN / SOLEMNLY AFFIRMED
BY Dorshni
B/o Ichalir
WHO IS PERSONALLY KNOWN
TO ME IDENTIFIED BY
Adv. Tojnesir
BEFORE ME THIS 2025 19
DAY OF Dec AT KALMESHWAR.
19/12/2025

LANKESH A. GAJBHIYE
NOTARY
NAGPUR (M.S.) INDIA.

NOTARIAL | NOTARIAL | NOTARIAL | NOTARIAL | NOTARIAL

CANCELLED CANCELLED CANCELLED

Scanned with OKEN Scanner